# जपानी पुष्परचना - भाग २६




यावेळी एक वेगळीच हटके कल्पना निवडली आहे. पारदर्शक पुष्पपात्र वापरून रचना केली आहे. पारदर्शक पुष्पपात्र असल्यामुळे पुष्पपात्राच्या आत आणि बाहेर दोन्ही ठिकाणी फुले पाने वापरली आहेत.

पारदर्शक या शब्दावर थोडा विचार केला तेव्हा वाटले...
नात्यातील, वागण्यातील पारदर्शकता किती महत्त्वाची असतें नाही का?

इकेबाना करताना पानांफुलांचा वापर करून रेषा (Line work) निर्माण केल्या जातात. त्यातून पानांफुलांचे एकमेकातील नाते दिसते. यावेळी या रचना बघताना नात्यातील पारदर्शकतेचा विचार करू या.

कुठलेही नाते आनंदी, मोकळे, परिपक्व असेल तर ते अत्यंत पारदर्शक असतें. आत एक, बाहेर वेगळे नाही.... लहान मुले अशी असतात त्यामुळे ती मनात असेल ते सहज सांगतात, खरे बोलतात... कुठलाही आडपडदा ठेवत नाहीत. अगदी निष्पाप, निरागस भाव असतात त्यांच्या चेहऱ्यावर! आपण मोठे होतो तसे हा निष्पाप निरागस भाव हळू हळू लोपतो आणि अनेक भावछटा आपल्यात न कळत निर्माण होतात .... राग, द्वेष, लोभ, स्वार्थ, मत्सर आणि किती तरी!! पण आपल्याला जर याची खरंच मनापासून जाणीव होत असेल आणि त्यासाठी आपणच प्रयत्न केला तर ही पारदर्शकता आपल्यात निर्माण होईल. सगळीच नाती स्वच्छ, मोकळी आणि सुंदर होतील.

या रचनेत वापरलेली फुले पाने सुध्दा अगदी निरागस निर्लेप आहेत ... नाही का? रचनेतून खूप मोठा, महत्त्वाचा, रोजच्या जीवनाशी निगडित असा मेसेज आपल्याला मिळतोय असे वाटले.

धन्यवाद! आपला अभिप्राय जरूर कळवा.

**सौ. अरुंधती शिरीष देशपांडे**
व्हाईस प्रेसिडेंट, इकेनोबो पुणे शाखा
asdssd@gmail.com